महाराष्ट्राचे निडर दैनिक

# शौर्य मराठी

RNI-MAHMAR/2023/89125

epaper.shauryamarathi.com | जळगाव, धुळे, नंदुरबार | सोमवार, दि. ५ जानेवारी २०२६ | वर्ष २ रे | अंक ५७ | किंमत : ५ रु. | पाने ४


**दिन विशेष...**

१५५२ : मोघल सम्राट शहाजहान यांचा जन्म.

१८७४ : नोबेल पुरस्कार विजेते शरीरशास्त्रज्ञ जोसेफ एरलान्जर यांचा जन्म.

१९१३ : सुप्रसिध्द मराठी कादंबरीकार श्री.ना.पेंडसे यांचा जन्म.

१९४९ : राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनी (एन.डी.ए.) पुणे येथे सुरु झाली.

सेन्सेक्स ८५,७६२.०१ +५७३.४१(०.६७%)

डॉलर ₹ ९०.०१

आजचे तापमान (डिग्री सेल्सिअस)

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| जळगाव | ३० | १६ |
| दिल्ली | १७ | ०९ |
| मुंबई | ३३ | २० |
| नागपूर | २८ | १५ |
| पुणे | २९ | १३ |

**सुविचार**

प्रत्येक दिवस हा नवीन संधी घेऊन येतो, त्याचं स्वागत करा.

सुर्योदय - सुर्यास्त

स.-७:०६ संध्या-६:००

**सोने – चांदी**

सोने(१० ग्रॅम) - चांदी (प्रति किलो)

१,३८,५९०/- २,४१,०००/-

**केळी भाव**

नवती : ७५१ ते ७७०

पिल बाग : २५१ ते २७०

कांदे बाग : ----

## थोडक्यात

### ठाकरे बंधूंचा वचननामा नव्हे तर अपचननामा

**मुंबई ।** मुंबई महापालिका निवडणुकीसाठी उद्धव ठाकरे यांच्या शिवसेना आणि राज ठाकरे यांच्या मनसेचा जाहीरनामा रविवारी प्रसिद्ध झाला.

या जाहीरनाम्यावर सत्ताधारी भाजपकडून जोरदार टीका झाली आहे. भाजप नेते व मंत्री आशिष शेलार यांनी पत्रकार परिषदेत सांगितले

### भारत–बांगलादेश क्रिकेट संबंध धोक्यात!

**दिल्ली ।** बांगलादेशचा वेगवान गोलंदाज मुस्तफिजुर रहमान याला आयपीएल २०२६ मधून बाहेर करण्याचा बीसीसीआयचा निर्णय आता एका मोठ्या आंतरराष्ट्रीय वादाचे कारण बनला आहे. या प्रकरणामुळे केवळ भारत-बांगलादेश द्विपक्षीय मालिकाच नाही, तर भारतात याच वर्षी होणाऱ्या टी-२० वर्ल्ड कपवरही संकटाचे ढग जमा झाले आहेत.मुस्तफिजुरला केकेआरमधून रिलीज केल्यानंतर बांगलादेश क्रिकेट बोर्डाचे अध्यक्ष अमीनुल इस्लाम बुलबुल यांनी आक्रमक पवित्रा घेतला आहे.

# मुंबईचा महापौर महायुतीचाच हिंदू आणि मराठीच होणार

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांची मोठी घोषणा

वृत्तसंस्था । मुंबई

**महापालिका निवडणुकीची रणधुमाळी सुरू झाली आहे. काल मुंबई येथील वरळीतील भाजप आणि शिवसेनेच्या वतीने आयोजित मेळाव्यातून महायुतीच्या प्रचाराचा पहिला नारळ फुटला. मुंबईचा महापौर कोण होणार याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंचावरून थेट घोषणा करत मुंबईचा महापौर महायुती, हिंदू आणि मराठीच होणार असल्याचे मोठं विधान केले.**

तसेच यावेळी बोलताना फडणवीसांनी ठाकरे बंधूंवर निशाणा साधत उबाठाचे खासदार संजय राऊत यांच्यावर देखील टीका केली. मुंबई महापालिकेत श्रेय चोरणारी टोळी सक्रिय झाली आहे, अशा शब्दांत



फडणवीसांनी ठाकरे बंधूंवर झोंबणारी टीका केली. ही निवडणूक मुंबईकरांसाठी महत्वाची आहे देखील फडणवीस म्हणाले.

नुकतेच मुंबईत ठाकरे बंधूंची पुढची पिढी आमदार आदित्य ठाकरे आणि मनसेचे अमित ठाकरे यांनी त्यांची सत्ता मुंबईत आल्यावर काय काय बदल होतील याचे व्हीजन सादर केले. यावर फडणवीसांनी समाचार घेत मोठं घर त्याला देऊ आणि स्वप्न पूर्ण करु असेही ते म्हणाले.

मुंबईतील झोपडपट्टी परिसरातील लोकांना घर देऊ. महायुतीच्या सरकारने एसआरएच्या माध्यमातून घरं दिल्या, योजना आपल्या अजूनही सुरु आहेत. घरांचा प्रश्न आम्ही सोडवत आहोत, असे फडणीस म्हणाले. पत्राचाळीचा तुम्ही घोटाळा केला. तिथल्या लोकांना बेघर केलं, असा आरोपही फडणवीसांनी ठाकरे गटावर केला आहे. त्यामुळे आता मुंबई महापालिका निवडणुकीत राजकारण चांगलेच तापले आहे.

### ➤ राऊतांना खोचक टोला

**मुंबईचा महापौर महायुती, हिंदू आणि मराठीच होणार, पण परवा वारीस पठाण बोलून गेले बुरखेवाली मेयर बनेगी, मात्र सकाळचा भोंगा त्यावर बोलेना असा खोचक टोला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उबाठाचे नेते खासदार संजय राऊत यांना लगावला.**

# भाजपच्या बिनविरोध पॅटर्नची राज ठाकरे करणार पोलखोल

## प्रचार सभांमधून सादर करणार बिनविरोध पुरावे

वृत्तसंस्था । मुंबई

**महाराष्ट्रातील २९ महानगरपालिका निवडणुकांच्या रणधुमाळीत सत्ताधारी महायुतीला निवडणुकीपूर्वीच मोठा फायदा झाला आहे. नामनिर्देशन पत्र माघार घेण्याच्या शेवटच्या दिवशी राज्यभरात एकूण ६८ उमेदवार बिनविरोध निवडून आले आहेत. यापैकी सर्वाधिक ४४ उमेदवार भाजपचे, तर एकनाथ शिंदे गटाच्या शिवसेनेचे २२, अजित पवार गटाच्या राष्ट्रवादीचे २ आणि इस्लामिक पार्टीचा १ उमेदवार आहे. अपक्ष म्हणून एक जागा नमूद केली जात असली तरी मुख्य लाभ महायुतीलाच झाला आहे.**

कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेत सर्वाधिक २१ जागांवर महायुतीचे उमेदवार बिनविरोध निवडून आले, ज्यात भाजपचे १५ आणि शिंदे सेनेचे ६ उमेदवार आहेत. ठाणे, भिवंडी, पनवेल, जळगाव, धुळे, अहमदनगर आदी महापालिकांमध्येही असाच कल दिसला. या बिनविरोध विजयांमुळे महायुतीच्या गोटात उत्साहाचे वातावरण आहे. भाजप नेते या यशाचे श्रेय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या लोकप्रियतेला आणि पक्षाच्या रणनीतीला देत आहेत.



मात्र, विरोधकांनी या बिनविरोध निवडींवर गंभीर आक्षेप घेतले आहेत. दबाव, पैशाचे आमिष किंवा केंद्रीय यंत्रणांच्या धमकीच्या जोरावर विरोधी उमेदवारांना माघार घ्यायला भाग पाडले जात असल्याचा आरोप होत आहे. विशेषतः ठाणे आणि कल्याण-डोंबिवलीत मनसेच्या उमेदवारांनी माघार घेतल्याने मनसेला मोठा धक्का बसला आहे. मनसे नेते अविनाश जाधव यांनी थेट आरोप केला की, देशात आणि राज्यात लोकशाही संपली आहे. विरोधी पक्षांच्या कमकुवत उमेदवारांना निवडून त्यांचे काम करून घेतले जाते. मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी या प्रकरणी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. त्यांनी म्हटले आहे, (पान २ वर)

## इम्तियाज जलील यांचा संजय शिरसाटांवर पलटवार

# खोक्यावर विकल्या गेलेल्यांनी आम्हाला नीतीमत्ता शिकवू नये





वृत्तसंस्था । छ.संभाजीनगर

जे लोक गुवाहाटीला जाऊन खोक्यावर विकले गेले, त्यांनी माझ्यावर बोट ठेवू नये, स्वतःच्या पदाचा गैरवापर करून गोरगरीब दलित समाजाच्या जमिनी हडप करणारे आणि एमआयडीसीतील भूखंड खिशात टाकणाऱ्यांनी आम्हाला नीतिमत्ता शिकवू नये अशा शब्दांत एमआयएम नेते इम्तियाज जलील यांनी पालकमंत्री संजय शिरसाट यांना प्रत्युत्तर दिले आहे.

छत्रपती संभाजीनगर येथे आयोजित पत्रकार (पान २ वर)

### ➤ ७० जागा बिनविरोध होणे ही लोकशाहीची हत्या

राज्यात ७० उमेदवार बिनविरोध निवडून आल्याच्या मुद्द्यावर जलील यांनी भाजप आणि एकनाथ शिंदे यांच्यावर प्रशासकीय गुंडगिरीचा आरोप केला. उमेदवारांना उचलून नेणे त्यांच्यावर दबाव टाकून अर्ज मागे घ्यायला लावणे ही लोकशाहीला घातक ठरणारी गुंडगिरी आहे. निवडणूक आयोग आणि प्रशासकीय यंत्रणेला खिशात टाकण्याचे काम या सरकारने केले आहे, असा गंभीर आरोप त्यांनी केला.

# उद्धवजी, मुंबईत अशी चपराक बसेल की पुन्हा तुम्ही उठणार नाही

## नाशिकमधील महापालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर भाजप मेळाव्यात नेते गिरीश महाजनांची टीका

वृत्तसंस्था । नाशिक

**आगामी महापालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राज्याचे राजकीय वातावरण पार तापले असून, नाशिकच्या भूमीतून भाजपचे संकटमोचक आणि मंत्री गिरीश महाजन यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर अत्यंत बोचरी टीका केली आहे. 'उद्धवजी, मुंबईमध्ये तुम्हाला अशी चपराक बसेल की तुम्ही पुन्हा कधीच उठणार नाही,' अशा शब्दांत महाजन यांनी ठाकरेंना थेट आव्हान दिले आहे.**



**मराठीच्या मुद्द्यावरून ठाकरे बंधूंना लक्ष्य –** नाशिकमध्ये भाजपच्या प्रचाराचा नारळ आज मोठ्या उत्साहात फोडण्यात आला. प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण आणि मंत्री गिरीश महाजन यांच्या प्रमुख उपस्थितीत विजय संकल्प मेळावा पार पडला. यावेळी बोलताना महाजन यांनी उद्धव आणि राज ठाकरे या दोघांवरही निशाणा साधला. 'गेल्या २५ वर्षांपासून मराठी मराठीचा जप करून तुम्ही मराठी माणसासाठी नेमकं काय केलं? हे आता जनतेला चांगलंच समजलं आहे. मराठीच्या मुद्द्यावर एकत्र येऊन केवळ भूलथापा मारण्याचं काम सुरू आहे', असा घणाघात महाजन यांनी केला.गिरीश महाजन यांनी केवळ मुंबईच नव्हे, तर राज्यातील इतर महापालिकांबाबतही मोठा दावा केला आहे. ते म्हणाले की, 'राज्यातील १० प्रमुख महापालिकांमध्ये एकाही ठिकाणी विरोधी पक्षाचा महापौर बसणार नाही. १६ तारखेला जेव्हा निकाल लागेल, तेव्हा विरोधकांना आपली जागा कळलेली असेल.' महापालिकांच्या निवडणुकीत विरोधकांचा सुपडा साफ होणार असल्याचा आत्मविश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

### मुंबई महापालिकेत काय होणार?

मुंबई महापालिकेवर गेल्या अनेक दशकांपासून असलेल्या ठाकरेंच्या सत्तेला यंदा भाजपने सुरुंग लावण्याची पूर्ण तयारी केली आहे. महाजन यांच्या विधानाने हे स्पष्ट झाले आहे की, भाजपने मुंबईसाठी विशेष रणनीती आखली आहे. मुंबईकरांना आता बदल हवा आहे आणि तो बदल मतपेटीतून दिसेल, असेही त्यांनी स्पष्ट केले. नाशिकमधील या मेळाव्यानंतर आता ठाकरे गटाकडून गिरीश महाजन यांच्या या चपराक विधानाला काय प्रत्युत्तर मिळते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. मुंबईच्या सत्तेचा झेंडा कुणाच्या हाती जाणार, याचा फैसला आता काही दिवसांवरच येऊन ठेपला आहे.


# बिनविरोध निवड धोकादायक मतदारांच्या नोटा अधिकाराचे काय?

वृत्तसंस्था । मुंबई

**राज्यातील काही महापालिकांमधे पहिल्यांदाच फार मोठ्या प्रमाणावर निवडणुकीच्या रिंगणात असलेल्या अनेक राजकीय पक्षांच्या किंवा अपक्ष उमेदवारांनी आपली उमेदवारी अदृश्य दबावामुळे मागे घेतल्याने सत्ताधारी राजकीय पक्षांचे उमेदवार निवडणुकीआधीच निवडून आल्याचे दिसून येत आहे. लोकशाही प्रक्रियेत हे फारच धोकादायक आहे.**

याबाबत निवडणूक आयोगाने अहवाल मागविला असला तरी अशा प्रभागात फेरनिवडणूक घेण्याची आवश्यकता आहे. बिनविरोध निवडून आलेल्या उमेदवाराविरुद्ध

## मुंबई ग्राहक पंचायतीचा सवाल



मतदारांना मिळालेल्या नापसंतीचे (नोटा) मत नोंदविण्याच्या अधिकाराचे काय, असा सवाल मुंबई ग्राहक पंचायतीने विचारला आहे.

या नाट्यपूर्ण खेळीत सत्तारूढ पक्षांकडून फार मोठ्या प्रमाणावर पैशाचा आणि दबावतंत्राचा वापर झाल्याचा निष्कर्ष निघू शकतो. अशा परिस्थितीत निवडणूक आयोगाने संबंधित प्रभागातील एकच उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात राहिल्याने त्याला विजयी घोषित न करता तिथेही निवडणूक घेण्यात यावी. असे न केल्यास मतदारांना अशा उमेदवाराविरुद्ध आपला नापसंतीचे (नोटा) मत नोंदवण्याचा अधिकारच हिरावला जाईल आणि मतदारांना गृहीत धरले जाईल, अशी भीती ग्राहक पंचायतीने व्यक्त केली आहे.लोकशाहीतील कोणतीही निवडणूक मोकळ्या वातावरणात, पारदर्शकपणे होणे भारतीय घटनेला अपेक्षित आहे. ज्या पद्धतीने केवळ अपक्षच नाही तर राजकीय पक्षांच्या उमेदवारांनी सुद्धा आपली उमेदवारी मागे घेतली आहे ती परिस्थिती लक्षात घेता वास्तविक अशा प्रभागांमधील (पान २ वर)

## आ. विकास ठाकरे यांच्या पीएच्या 'हाती' 'घड्याळ'

वृत्तसंस्था । नागपूर

महानगरपालिकेच्या निवडणुकीत भाजप सोबतच काँग्रेसलाही बंडखोरीची लागण झाली आहे. यात काँग्रेसचे पश्चिम नागपूर आमदार तथा शहराध्यक्ष विकास ठाकरे यांचे प्रभाग समन्वयक पीए सत्यम सोडवीर यांनी काँग्रेसच्या 'पंजा'ला रामराम केला. त्यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वातील राष्ट्रवादी काँग्रेसचे घड्याळ हाती घेतले आहे.

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा उद्या जळगावात भव्य 'रोड शो'

प्रतिनिधी । जळगाव



जळगाव शहरात आगामी महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पार्टीच्या वतीने मा. मुख्यमंत्री ना. देवेंद्रजी फडणवीस यांचा भव्य रोड शो मंगळवार, दिनांक ६ जानेवारी २०२६ रोजी आयोजित करण्यात आला आहे. हा रोड शो दुपारी ३ वाजता छत्रपती शिवाजी महाराज पुतळा येथून सुरू होणार आहे.

रोड शोचा मार्ग छत्रपती शिवाजी महाराज पुतळा – नेहरू चौक – घाणेकर चौक – सुभाष चौक – चित्रा चौक – गोलाणी मार्केट असा असून पुन्हा छत्रपती शिवाजी महाराज पुतळा येथे त्याचा समारोप होणार आहे. या मार्गावर नागरिकांकडून मुख्यमंत्री फडणवीस यांचे जंगी स्वागत होण्याची शक्यता आहे. रोड शो संपल्यानंतर त्याच ठिकाणी मा. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस पत्रकार बांधवांशी थेट संवाद साधणार असून (पान २ वर)

# जानेवारीच्या दुसऱ्या आठवड्यात पुन्हा तापमानाचा पारा घसरणार

## मध्य आशियातून आलेल्या शीत लहरींमुळे कडाक्याची थंडी

वृत्तसंस्था । मुंबई

**देशात यंदाचा डिसेंबर महिना सरासरीपेक्षा थंड ठरला. रशियाच्या उत्तरेकडील सैबेरिया, मध्य आशिया आणि काळ्या समुद्रापासून आलेले थंड हवेचे झोत आणि वायव्य भारतात तयार झालेल्या वाऱ्याच्या प्रतिचक्रीय स्थितीमुळे डिसेंबर महिन्यात देशाचे किमान तापमान सरासरीपेक्षा ०.०८ अंश सेल्सिअने कमी राहिले.**

भारतीय हवामान विभागाने दिलेल्या




माहितीनुसार, १९०१ पासूनच्या सरासरी तापमानापेक्षा २०२५ हे वर्ष भारतासाठी आठवे उष्ण वर्ष ठरले आहे. पण, डिसेंबर महिन्यात दक्षिण भारत वगळता उर्वरीत भारताने कमाल तापमान सरासरीपेक्षा कमी अनुभवले आहे. देशाचे सरासरी किमान तापमान १२.२७ अंश सेल्सिअस असते, ते यंदा १२.१९ अंश सेल्सिअस राहिले. मध्य भारतात सरासरी किमान १२.९५ अंश सेल्सिअस असते, ते १२.१७ अंश सेल्सिअस होते. हिवाळ्यात रशियाच्या उत्तरेकडील अतिथंड सैबेरियापासून मध्य आशियाच्या दिशेने थंड वाऱ्याचे झोत वाहतात. अनेकदा काळ्या समुद्रावरूनही थंड वारे येतात. हे थंड वारे हिमालय (पान २ वर)

### ● वाऱ्याच्या प्रतिचक्रीय स्थितीमुळे थंडी

**हिमालयासह अफगाणिस्तान, अरबी समुद्राच्या वायव्य भागात असलेली थंड हवा वाऱ्याच्या प्रतिचक्रीय स्थितीमुळे उत्तर भारतासह महाराष्ट्रापर्यंत पोहचली. त्यामुळे तापमानात घट होऊन डिसेंबरमध्येच कडाक्याची थंडी पडली होती, अशी माहिती हवामान विभागाचे शास्त्रज्ञ डॉ. एस. डी. सानप यांनी दिली.**

# उबाठा पक्षाचे प्रवक्ते आनंद दुबेंना मिळाल्या धमक्या; अदखलपात्र गुन्हा दाखल

वृत्तसंस्था । मुंबई



बांगलादेशी वेगवान गोलंदाज मुस्तफिझूर रहमानला कोलकाता नाइट रायडर्सच्या २०२६ च्या आयपीएल संघातून वगळण्याच्या बीसीसीआयच्या निर्णयाचे कौतुक केल्याबद्दल ठाकरेसेना प्रवक्ते आनंद दुबे यांना जीवे मारण्याच्या धमक्या मिळाल्याचा दावा केला आहे. दुबे यांना त्यांच्या व्हॉट्सॲप क्रमांकावर धमकीचे संदेश आणि अज्ञात व्यक्तींकडून फोनही आले असल्याचे त्यांनी म्हटले. त्यांच्या तक्रारीवरून अदखलपात्र गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सोशल मीडियावर एक सविस्तर पोस्ट शेअर करून दुबे यांनी दावा केला की, बीसीसीआयच्या निर्णयाला चांगला निर्णय म्हटल्याबद्दल त्यांचा अपमान करण्यात आला आणि त्यांना धमक्या देण्यात आल्या आहेत. हा मुद्दा (धमक्या आणि शिवीगाळ) गंभीर आहे. पोलिस राज्य सरकारने याची दखल घेतली पाहिजे. दोन्ही शेजारील (पान २ वर)

## संपादकीय

### भाडेवाढीचा बडगा का?

२६ डिसेंबरपासून लागू झालेली भाडेवाढ, प्रवाशांच्या सामानावर घातलेली वजनाची मर्यादा आणि प्रवाशांना मिळणाऱ्या निकृष्ट सुविधा या पार्श्वभूमीवर रेल्वेच्या धोरणांचे सखोल विश्लेषण करणे गरजेचे आहे. अलीकडच्या काळात भारतीय रेल्वेची ओळख सामान्य माणसाचे प्रवासासाठीचे सुलभ साधन अशी न राहता नफा कमावणारे सरकारी यंत्र अशी अधिक होताना दिसत आहे. चालू वर्षात रेल्वेने दुसऱ्यांदा प्रवास भाडे वाढवले आहे. यापूर्वी जून महिन्यात रेल्वेने प्रवासभाडे वाढवण्याचा निर्णय घेतला होता. १ जुलै २०२५ पासून ही भाडेवाढ लागू झाली. त्यानंतर आता पाच महिन्यातच रेल्वेनं प्रवास भाडे वाढविले आहे. जेव्हा सरकार भाडे वाढवते, तेव्हा त्यामागे सेवा सुधारण्याचे तर्क दिले जातात; परंतु वास्तवात ही भाडेवाढ सामान्यांच्या खिशाला कात्री लावणारी ठरत आहे. लांब पल्ल्याच्या प्रवासासाठी तिकीट महाग होणार आहे. भारतीय रेल्वेच्या भाडेवाढीचा इतिहास पाहिला तर आपल्याला एक गोष्ट स्पष्टपणे जाणवते की, पूर्वी रेल्वे भाडेवाढ ही केवळ वार्षिक रेल्वे अर्थसंकल्पाचा भाग असायची. संसदेत रेल्वे अर्थसंकल्प सादर केला जायचा, त्यावर चर्चा व्हायची आणि मगच भाडेवाढ लागू केली जायची. मात्र, २०१७ मध्ये रेल्वे अर्थसंकल्पाचे सर्वसाधारण अर्थसंकल्पात विलीनीकरण करण्यात आले आणि तिथूनच गणिते बदलली. आता सरकारला भाडे वाढवण्यासाठी कोणत्याही विशेष मुहुर्ताची किंवा संसदेच्या मंजुरीची गरज भासत नाही.प्रशासकीय आदेशाद्वारे कधीही भाडेवाढ केली जाते. १९९० च्या दशकापर्यंत रेल्वेभाडे अत्यंत कमी होते, कारण, रेल्वेकडे एक ङ्गकल्याणकारी सेवाफ म्हणून पाहिले जात असे. मात्र, २००० सालापासून रेल्वेच्या व्यापारीकरणाला वेग आला. २००२ ते २०१२ या काळात थेट भाडेवाढ टाळली गेली, पण शुल्क, इंधन अधिभार आणि सुपरफास्ट अधिभार यांसारख्या अप्रत्यक्ष मार्ग वापरले गेले. २०१४ नंतर 'फ्लेक्सी फेअर' सारखी संकल्पना आणली गेली आणि यामध्ये मागणीनुसार विमानासारखे भाडे वाढवले जाऊ लागले. आता झालेली १ ते २ पैशांची प्रति किलोमीटर वाढ ही जरी किरकोळ वाटत असली, तरी ६०० कोटी रुपयांचा अतिरिक्त महसूल सरकारला केवळ तीन महिन्यांत मिळणार आहे, हे या भाडेवाढीचे खरे आर्थिक स्वरूप आहे.रेल्वेने अलीकडेच सामानाच्या वजनावर मर्यादा घालून त्यापेक्षा जास्त वजनासाठी दंड आकारण्याचे धोरण राबवले आहे. सेकंड क्लासमधून प्रवास करणाऱ्यांसाठी ३५ किलोपर्यंत सामान मोफत नेता येईल. त्यानंतर ७० किलोपर्यंत सामानावर शुल्क आकारले जातील. स्लीपर क्लासच्या प्रवाशांसाठी ४० किलो मोफत सामान नेण्याची परवानगी आहे. त्यावर ८० किलोपर्यंत सामानावर शुल्क आकारले जाणार आहे. भारतीय रेल्वेने प्रवास करणारा बहुतांश वर्ग हा मध्यम किंवा कनिष्ठ मध्यमवर्गीय असतो, जो आपल्यासोबत घरगुती सामान, धान्य किंवा भेटवस्तू घेऊन प्रवास करत असतो.विमान प्रवासासारखे नियम रेल्वेला लावणे हे या देशाच्या सामाजिक वास्तवाकडे दुर्लक्ष करण्यासारखे आहे. विमान प्रवासात मर्यादा असणे समजण्यासारखे आहे; कारण तिथली तांत्रिक रचना वेगळी असते, पण रेल्वेमध्ये जिथे सर्वसामान्य माणूस आपल्या कुटुंबासह प्रवास करतो, तिथे अशा मर्यादा लादणे हे प्रवाशांची आर्थिकदृष्ट्या पिळवणूक करण्याचे आणखी एक साधन बनले आहे.सरकार रेल्वेला आंतरराष्ट्रीय दर्जाफ देण्याच्या गप्पा मारते, वंदे भारतसारख्या आधुनिक गाड्या सुरू केल्या जातात, पण या गाड्यांचे भाडे सामान्य माणसाच्या आवाक्याबाहेरचे आहे. दुसरीकडे, नियमित रेल्वे गाड्यांची अवस्था पूर्वीच्या तुलनेत सुधारली असली तरी आजही अनेक ठिकाणी गलथानपणा दिसून येतो. आज आरक्षित तिकीट मिळवणे हे एक मोठे युद्ध जिंकल्यासारखे वाटते.

# अंगणवाडीतील चिमुकल्यांना आठवड्यातून एकदा प्राथमिक शाळेतील शिक्षक देणार धडे

● शालेय शिक्षण विभागाकडून आदेश जारी; विद्यार्थ्यांचा होईल विकास

प्रतिनिधी । जळगाव

**अंगणवाडीतील चिमुकल्यांच्या शिक्षणाचा पाया अधिक भक्कम करण्यासाठी राज्य शासनाने एक महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. आता जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळांतील शिक्षकांना आठवड्यातून किमान एक दिवस जवळच्या अंगणवाडीत जाऊन विद्यार्थ्यांना धडे द्यावे लागणार आहेत. यासंदर्भातील आदेश शालेय शिक्षण विभागाने जारी केले आहे. राज्यातील जिल्हा परिषद शाळांशी जोडलेल्या किंवा परिसरातील अंगणवाड्यांमध्ये आता प्राथमिक शिक्षकांची उपस्थिती अनिवार्य असणार आहे.**




अंगणवाडी हा शालेय शिक्षणाचा पहिला टप्पा आहे. जर या स्तरावरच अनुभवी प्राथमिक शिक्षकांचे मार्गदर्शन मिळाले, तर विद्यार्थ्यांचा बौद्धिक आणि भाषिक विकास वेगाने होईल. पहिलीत प्रवेश घेण्यापूर्वीच मुले प्राथमिक शिक्षणाशी परिचित होतील. खेळांच्या माध्यमातून शिक्षण आणि कृतियुक्त अध्यापन यावर शिक्षक भर देतील.

नव्या नियमानुसार, प्राथमिक शिक्षकांनी आठवड्यातील किमान एक दिवस किंवा ठराविक तास अंगणवाडीतील मुलांसाठी द्यायचे आहेत. यामुळे प्राथमिक शाळा आणि अंगणवाडी यांच्यातील अंतर कमी होऊन मुलांमध्ये शिक्षणाची गोडी निर्माण होईल.

**■ ३८०० अंगणवाड्यांत १ लाखपेक्षा जास्त मुले**

जळगाव जिल्ह्यात सुमारे ३ हजार ८०० हून अधिक अंगणवाड्या कार्यरत आहेत. यामध्ये १ लाखाहून अधिक मुले पूर्व प्राथमिक शिक्षणाचे धडे गिरवत आहेत. या सर्व मुलांना आता अनुभवी जि.प. शिक्षकांचे मार्गदर्शन मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

# जिल्ह्यात १४ जानेवारीपर्यंत प्रतिबंधात्मक आदेश जारी

प्रतिनिधी । जळगाव

**जिल्ह्यात आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची मतमोजणी तसेच विविध स्वरुपाची सण, उत्सव, थोर पुरुषांच्या जयंती या साजऱ्या होणार आहेत. या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी, यासाठी अपर जिल्हादंडाधिकारी वैशाली चव्हाण यांनी मुंबई पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (१) व (३) अन्वये प्रतिबंधात्मक आदेश जारी केले आहेत.**

हे प्रतिबंधात्मक आदेश दि.३१ डिसेंबर रोजी रात्री १२ वाजेपासून ते १४ जानेवारी रोजी रात्री १२ वाजेपर्यंत लागू राहणार आहे. आदेशान्वये शस्त्र बाळगणे, स्फोटके, धोकादायक वस्तू वापरणे, प्रतिमा दहन तसेच



पोलिस अधिक्षक, जळगाव यांच्या पुर्व परवानगी शिवाय सभा घेण्यास किंवा मिरवणुका काढण्यास बंदी घालण्यात आली आहे.

सरकारी कार्यक्रम, अंत्ययात्रा, लग्न समारंभ व धार्मिक मिरवणुका तसेच शासनाच्या सेवेतील व्यक्तीना व ज्यांना आपल्या वरिष्ठांच्या आदेशानुसार कर्तव्य पूर्तीसाठी हत्यारे बाळगणे आवश्यक आहे, त्यांना हा आदेश लागू राहणार नाही, असेही आदेशात नमुद करण्यात आले आहे.

# एलडब्ल्यूसीपीएलमध्ये नारायणी डॉमिनेटर्स संघ ठरला विजयी

प्रतिनिधी । जळगाव

**लाडशाखीय वाणी समाज, जळगाव शहरच्यावतीने एलडब्ल्यूसीपीएल टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेचे नुकतेच आयोजन करण्यात आले होते. स्पर्धेत नारायणी डॉमिनेटर्सने गौरी चॅलेंजर्स संघाचा पराभव करत विजय पटकावला.**

स्पर्धेत समाजातील १० संघांनी सहभाग नोंदविला होता. स्पर्धेचा अंतिम सामना नारायणी डॉमिनेटर्स व गौरी चॅलेंजर्स या दोन संघांमध्ये खेळला गेला. अटीतटीच्या या सामन्यात नारायणी डॉमीनेटर संघाचा कर्णधार आदित्य वाणीने शेवटच्या षटकातील शेवटच्या चेंडूवर विजयासाठी आवश्यक असलेल्या दोन धावा काढत सामना जिंकला.

स्पर्धेत उत्कृष्ट खेळाडू म्हणून नारायणी डॉमिनेटर संघाचा कृष्णा वाणी, उत्कृष्ट गोलंदाज म्हणून ऋषी येवले तर अंतिम सामन्यात मॅन ऑफ द मॅच म्हणून सौरभ बाविस्करला गौरविण्यात आले. उत्कृष्ट महिला फलंदाज म्हणून ऋतुजा मालपुर यांना तर उत्कृष्ट महिला गोलंदाज म्हणून सुप्रिया चांदसरकर व योगिता बोरकर यांना गौरविण्यात आले.

स्पर्धेचे उद्घाटन आ. राजूमामा भोळे यांच्याहस्ते करण्यात आले तर बक्षीस वितरण समाजाचे अध्यक्ष मेजर नाना वाणी यांच्याहस्ते करण्यात आले.

याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून गजानन मालपुरे, सुभाष अंमळनेरकर, अनिल भोकरे, काशिनाथ पाटे, प्रमोद चांदसरकर, सुदाम वाणी, शांतीलाल नावरकर, अनिल माकडे, सागर अमळनेरकर, परेश शिनकर, सीए हंसराज अमृतकर, श्रीकांत वाणी, महेंद्र शिरोडे, मीनाक्षी येवले, प्रशांत पाटे, युवा मंच अध्यक्ष पंकज बाविस्कर यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

# महिला शिक्षण हे समाज परिवर्तनाचे प्रभावी माध्यम

● अर्चना नाईक यांचे मत; संत ज्ञानेश्वर विद्यालयात 'लेक वाचवा, लेक शिकवा' अभियान



प्रतिनिधी । जळगाव

**महिला शिक्षण हे समाज परिवर्तनाचे प्रभावी माध्यम असून मुली शिक्षणाच्या जोरावर स्वावलंबी होतील व मुलींच्या उज्ज्वल भविष्यासाठी ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले लेक वाचवा, लेक शिकवा अभियान हा उपक्रम प्रेरणादायी ठरेल, असा विश्वास अर्चना नाईक यांनी व्यक्त केला.**

क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त संत ज्ञानेश्वर प्राथमिक व माध्यमिक विद्यालयात ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले लेक वाचवा, लेक शिकवा अभियानांतर्गत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी त्या बोलत होत्या.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला विद्यालयाच्या संचालिका अर्चना नाईक यांच्याहस्ते सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. यावेळी इयत्ता ७ वीची अंकिता फुलचंद्र यादव या विद्यार्थिनीने सावित्रीबाई फुले यांच्या जीवनावरील एकांकिका सादर केली. इयत्ता पाचवीच्या विद्यार्थीनींनी सामूहिक नृत्य सादर केले. सूत्रसंचालन रूपाली आव्हाड यांनी केले. यावेळी मुख्याध्यापक मुकेश नाईक, पर्यवेक्षिका शितल कोळी उपस्थित होते.

**■ दहावीपर्यंत मोफत प्रवेश, शिक्षणाची घोषणा...**

यावेळी संस्थेतर्फे शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी एक महत्त्वपूर्ण निर्णय जाहीर करण्यात आला. दि.३० जानेवारीपर्यंत इयत्ता पहिलीमध्ये प्रवेश घेणाऱ्या मुलींना इयत्ता पहिली ते दहावीपर्यंत मोफत शिक्षण, प्रवेश देण्यात येणार असल्याची घोषणा करण्यात आली. यावेळी बोलताना स्त्री सक्षमीकरणासाठी हा निर्णय घेण्यात येत असल्याचे मत अर्चना प्रशांत नाईक यांनी व्यक्त केले.

## पान १ वरुन

### भाजपच्या बिनविरोध पॅटर्नची......

माझ्या आयुष्यात अशी निवडणूक कधी पाहिली नाही. बाळासाहेब ठाकरेंसोबत अनेक निवडणुका पाहिल्या, पण इतक्या मोठ्या प्रमाणात बिनविरोध निवडी होताना पहिल्यांदाच पाहतो आहे. ठाण्याचे मनसे शहराध्यक्ष अविनाश जाधव, अभिजीत पानसे आणि माजी आमदार राजू पाटील यांनी राज ठाकरेंच्या शिवतीर्थ निवासस्थानी भेट घेऊन ही माहिती दिली. याच भेटीत राज ठाकरे यांनी बिनविरोध निवडींवरून हे वक्तव्य केले. राज ठाकरे यांच्या नेतृत्वात मनसे या प्रकरणी आक्रमक झाली आहे. आगामी प्रचार सभांमध्ये ते कॉल रेकॉर्ड्स आणि व्हिडिओच्या माध्यमातून महत्त्वाचे पुरावे जनतेसमोर आणणार आहेत. ठाणे आणि कल्याण-डोंबिवलीतील स्थानिक नेत्यांनी हे पुरावे राज ठाकरेंकडे सुपूर्द केल्याची माहिती आहे. याशिवाय, मनसे येत्या सोमवारी बिनविरोध निवडून आलेल्या उमेदवारांच्या जागांबाबत कोर्टात दाद मागणार आहे. तसेच, मनसेचे प्रमुख नेते राज्य निवडणूक आयुक्तांची भेट घेऊन तक्रार करणार आहेत.

### खोक्यावर विकल्या गेलेल्यांनी......

परिषदेत जलील यांनी शिरसाटांच्या आरोपांना प्रत्युत्तर देताना महायुती सरकारच्या गुंडगिरीवर जोरदार प्रहार केला. इम्तियाज जलील म्हणाले की, उत्तर प्रदेशातील एका घटनेचा उल्लेख करत जलील म्हणाले की जेव्हा एखादा मुख्यमंत्री लहान मुलीचा बुरखा स्वतःच्या हाताने काढतो. तेव्हा ती निंदनीय गोष्ट असते. जर कोणी म्हणत असेल की त्यांचा हात इकडे तिकडे गेला असता तर काय झाले असते? तर अशांचे हात तोडून त्यांच्याच हातात देण्याची ताकद आमच्यात आहे. ती मुलगी कोणत्याही जाती-धर्माची असो आमची भूमिका हीच राहिली असती.

### बिनविरोध निवड धोकादायक......

निवडणूकच रद्दबातल करून तिथे नव्याने अर्ज मागवून मोकळ्या वातावरणात निवडणूक घेणे गरजेचे आहे, असे मत ग्राहक पंचायतीने व्यक्त केले आहे. याबाबत निवडणूक आयोगाकडे तक्रारही दाखल केली जाणार आहे. याविरोधात निवडणूक आयोगाने ठाम भूमिका न घेतल्यास भविष्यात चुकीचा पायंडा पडण्याची शक्यता आहे. या विरोधात आवश्यकता भासल्यास न्यायालयातही धाव घेऊ, असे ग्राहक पंचायतीचे कार्याध्यक्ष ॲड. शिरीष देशपांडे यांनी सांगितले. उमेदवारी अर्ज मागे घेण्याची मुदत शुक्रवारी संपल्यानंतर विविध महापालिकांमध्ये आपले ७० नगरसेवक बिनविरोध निवडून आल्याचा दावा विविध राजकीय पक्षांनी केला. यापैकी सर्वाधिक बिनविरोध नगरसेवक महायुतीचे आहेत. उमेदवारी अर्जाची छाननी झाल्यावर आणि उमेदवारी अर्ज मागे घेण्याची मुदत संपल्यावर संबंधित निवडणूक प्रभागात जो एकमेव वैध उमेदवार शिल्लक राहिला तो बिनविरोध निवडून आला, अशा गृहितकाच्या आधारे हे दावे करण्यात आले आहेत. ज्या प्रभागांच्या बाबतीत असे बिनविरोध निवडीचे दावे केले गेले आहेत, तेथे इतर उमेदवारांना धाकदपटशा करून एक तर अर्ज भरू दिले गेले नाहीत, ते मागे घ्यायला लावले किंवा काहींचे अर्ज दबावाखाली अयोग्यपणे फेटाळले गेले, असा आरोप विरोधी पक्षांनी केला आहे. या प्रभागांचे निकाल राज्य निवडणूक आयोगाने अधिकृतपणे जाहीर केलेले नाहीत. उलट, विरोधी पक्षांच्या आरोपांची दखल घेत, आयोगाने या प्रकरणी चौकशीचे आदेश दिले असून, त्याचा निष्कर्ष येईपर्यंत निकाल जाहीर केले जाणार नाहीत, असे स्पष्ट केले आहे. खरे तर, आयोगानेच तयार केलेल्या नियमांनुसार निवड बिनविरोध असली तरी, तसा निकाल मतमोजणीनंतरच जाहीर करता येतो, असे या क्षेत्रातील तज्ज्ञांचे म्हणणे आहे.

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस......

शहर व राज्यातील राजकीय, विकासात्मक विषयांवर आपली भूमिका मांडणार आहेत. या संवाद कार्यक्रमात माध्यम प्रतिनिधींना प्रश्न विचारण्याची संधी देण्यात येणार आहे.

या कार्यक्रमास मोठ्या संख्येने भाजप कार्यकर्ते, पदाधिकारी व नागरिक उपस्थित राहणार असल्याची माहिती जिल्हा प्रसिद्धीप्रमुख मनोज भांडारकर यांनी दिली आहे.

### जानेवारीच्या दुसऱ्या आठवड्यात......

पर्वत आडवितो. पण, वाऱ्याचा झोत तीव्र असल्यास थंड वारे हिमालय ओलांडून उत्तर भारतात आणि पुढे मध्य भारतापर्यंत पोहचतात. यावेळी डिसेंबर महिन्यात गुजरात, राजस्थान आणि अरबी समुद्रावर वाऱ्याची प्रतिचक्रीय स्थिती सक्रीय होती. या प्रतिचक्रीय स्थितीमुळे हिमालय, अफगाणिस्तान आणि वायव्य अरबी समुद्रावर असलेले थंड वारे उत्तर भारतातसह मध्य भारतापर्यंत पोहचले. त्यामुळे नागपूर, नाशिक, पुण्यासह थेट मुंबईपर्यंत कमाल, किमान तापमानात घट झाली होती. वायव्य भारतावर असलेली वाऱ्याची प्रतिचक्रीय वाऱ्याची स्थिती निवळली आहे. त्यामुळे जानेवारीच्या पहिल्या आठवड्यात थंडी कमी होऊन, तापमानात वाढ झाली आहे. पण, दुसऱ्या आठवड्यात उत्तर भारतात थंडी वाढण्याची शक्यता आहे.

### उबाठा पक्षाचे प्रवक्ते......

देशांमधील वाढत्या राजनैतिक तणावाच्या पार्श्वभूमीवर, भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) सूचना दिल्यानंतर कोलकाता नाइट रायडर्सने रहमानला संघातून वगळले आहे. त्याला आयपीएल लिलावात ९.२ कोटी रुपये बोली मिळाली होती. २६ मार्चपासून सुरू होणाऱ्या या स्पर्धेसाठी आवश्यक असल्यास केकेआरला बदली खेळाडू निवडण्याची परवानगी दिली जाईल.

# क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त कास्ट्राईब दिनदर्शिकेचे प्रकाशन

प्रतिनिधी । जळगाव

**क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांचे जयंतीचे औचित्य साधून निवासी जिल्हाधिकारी वैशाली चव्हाण आणि नाशिक विभागीय अध्यक्ष रविंद्र तायडे यांच्याहस्ते कास्ट्राईब दिनदर्शिकेचे प्रकाशन करण्यात आले.**



यावेळी कास्ट्राईब कर्मचारी महासंघाचे जिल्हाध्यक्ष पुलकेशी केदार, जिल्हा कार्याध्यक्ष योगेश अडकमोल, कास्ट्राईब शिक्षक संघटनेचे प्रा.प्रमोद लोढे, जेष्ठ सल्लागार साधना बाविस्कर, कास्ट्राईब मनपाचे जिल्हाध्यक्ष सुरेश भालेराव, कार्याध्यक्ष नंदकुमार गायकवाड, नायब तहसीलदार राहुल सोनवणे, अव्वल कारकून महेश सपकाळे, मंडळ अधिकारी विलास डोंगरे, अव्वल कारकून सुभाष तायडे, महसूल विभागाचे भास्कर घुले, भीमराव देसले, नवनाथ सदाफुले, कास्ट्राईब पाटबंधारे विभाग संघटनेचे जिल्हाध्यक्ष सचिन सपकाळे, सचिव जिभाऊ हटकर, संघटक अजय बोरसे, सिद्धार्थ जवरे, राहुल करसकर, विवेक गोंधळी, आनंदाने मानकर, रवींद्र गायकवाड, गणेश खोंडे आदी उपस्थित होते.

सुरुवातीला कास्ट्राईब कर्मचारी महासंघाचे विभागीय अध्यक्ष रविंद्र तायडे यांनी कर्मचाऱ्यांच्या विविध अडी-अडचणीबाबत निवासी जिल्हाधिकारी वैशाली चव्हाण यांच्याशी चर्चा केली. त्यावर निवासी जिल्हाधिकाऱ्यांनी साकारात्मक विचार करुन अडी-अडचणी सोडविल्या जातील, असे आश्वासन दिले.

**■ सभासद, पदाधिकाऱ्यांनी उभारला निधी...**

यावेळी बोलतांना विभागीय अध्यक्ष तायडे यांनी, संघटनेचे सर्व सभासद व पदाधिकाऱ्यांनी निधी उभारून दिनदर्शिका काढण्याचे काम केले असून दिनदर्शिकेसाठी कुठलेही मूल्य न आकरता सर्व कार्यालयात व कर्मचाऱ्यांना दिनदर्शिका विनामूल्य पुरविण्यात येणार असल्याचे सांगितले.

# आचारसंहितेमुळे लोकशाही दिन रद्द

प्रतिनिधी । जळगाव

सहकारी संस्थाशी संबंधित तक्रारींच्या निवारणासाठी जिल्हा उपनिबंधक कार्यालयातर्फे दरमहा जिल्हास्तरीय लोकशाही दिन आयोजित करण्यात येतो. या महिन्यात देखील सोमवार, दि.५ रोजी लोकशाही दिनचे आयोजन करण्यात आले होते. मात्र, सध्या जळगाव शहर महानगरपालिकेच्या निवडणुकीसाठी आचारसंहिता लागू असल्याने हा लोकशाही दिन रद्द करण्यात आला आहे, याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी, अशी माहिती जिल्हा उपनिबंधक धर्मराज पाटील यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली आहे.

# दिव्य असणाऱ्या मुलांसाठी कार्य करणारे सर्वच शिक्षक महान

● उद्योजक रजनीकांत कोठारी यांचे गौरवोद्गार; दिव्यांगाच्या कलाविष्काराने भारावले जळगावकर

प्रतिनिधी । जळगाव

**दिव्यांग नसून दिव्य असणाऱ्या मुलांसाठी कार्य करणारे सर्वच शिक्षक महान आहेत. या मुलांसाठी ते घेत असलेल्या अपार मेहनतीला माझा सलाम. या मुलांसाठी मलाही काही करता आले तर त्यासाठी मी सदैव तयार आहे. बालरंगभूमी परिषद या विशेष मुलांसाठी करत असलेले कार्य कौतुकास्पद असल्याचे गौरवोद्गार उद्योजक रजनीकांत कोठारी यांनी काढले.**




बालरंगभूमी परिषद मध्यवर्ती आयोजित व जळगाव जिल्हा शाखा संयोजित दिव्यांग महोत्सव 'यहाँ के हम सिकंदर' या महोत्सवाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.

शहरातील छत्रपती शिवाजी महाराज क्रीडा संकुलाच्या ऑडिटोरियममध्ये बालरंगभूमी परिषदेचा हा विशेष मुलांच्या कलाविष्काराचा महोत्सव रंगला. प्रारंभी सकाळी १० वाजता महोत्सवाचे उद्घाटन नटराज पूजन व दीपप्रज्वलनाने करण्यात आले. यावेळी व्यासपीठावर उद्योजक रजनीकांत कोठारी, बँक ऑफ महाराष्ट्राचे प्रबंधक प्रविणकुमार सिंह, जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी पद्मनाभ म्हस्के, जिल्हा क्रीडा अधिकारी रविंद्र नाईक, इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे सहाय्यक संचालक योगेश पाटील, बालरंगभूमी परिषद मध्यवर्तीचे कोषाध्यक्ष नंदकिशोर जुवेकर, प्रभारी प्रमुख कार्यवाह योगेश शुक्ल आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन जळगावचे प्रमुख कार्यवाह विनोद ढगे यांनी केले. महोत्सवात जिल्ह्यातील १९ विद्यालयातील ३८० दिव्यांग बालकलावंतांनी सहभाग घेत, नृत्य-नाट्य-गायन-चित्रकला आदी कलांनी उपस्थित प्रेक्षकांना भारावून सोडले. समारोप प्रसंगी सहभागी प्रत्येक बालकलावंतांचा प्रमाणपत्र देवून गौरव करण्यात आला. त्याचप्रमाणे सहभागी विद्यालय व संस्थांचा सन्मानचिन्ह देवून गौरव करण्यात आला. या दिव्यांग मुलांसाठी कार्य करणाऱ्या प्रत्येक विद्यालयातील ५ शिक्षकांचाही यावेळी बालरंगभूमी परिषदेतर्फे सत्कार करण्यात आला.

महोत्सवाच्या यशस्वीतेसाठी बालरंगभूमी परिषदेचे कोषाध्यक्ष सचिन महाजन उपाध्यक्षा नेहा पवार, कार्यकारिणी सदस्य मोहीत पाटील आकाश बाविस्कर, सुदर्शन पाटील, ज्ञानेश्वर सोनवणे,सुरेखा मराठे अवधूत दलाल, संतोष चौधरी, हर्षल पवार, पंकज बारी आदींनी परिश्रम घेतले.


हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादक सागर काशिनाथ ओतारी व मालक रेखाबाई काशिनाथ ओतारी यांनी श्री समर्थ कृपा डिजिटल प्रिंटर्स, पी -३३, औद्योगिक वसाहत शॉपिंग कॉम्प्लेक्स, जुनी एमआयडीसी, जळगाव -४२५००१ येथे छापून शॉप नं. ई-१२, चौथा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव- ४२५००१ (महाराष्ट्र), येथे प्रसिद्ध केले.
✻ कार्यकारी संपादक - किशोर शंकर शिंपी (मोबा. - ७५८८८१३१३२) (✻ पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील) (RNI-MAHMAR/2023/89125) E-Mail : dainikshauryamarathi@gmail.com

# पुढच्या पिढ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी भाजपच्याच पाठीशी राहा!

## भाजप उमेदवारांच्या प्रचारार्थ आयोजित जाहीर सभेत प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांचे आवाहन

प्रतिनिधी । धुळे

**येथील महापालिकेची येत्या १५ जानेवारीला होऊ घातलेली निवडणूक ही केवळ १९ प्रभागांतील नगरसेवक निवडून देण्यासाठी नाही, तर भारतीय जनता पक्षाच्या नेतृत्वात २०१४ पासून होत असलेल्या सर्वांगीण विकासाचा रथ अखंड पुढे नेण्यासाठी आहे. आपल्या पुढच्या पिढ्यांचे उज्ज्वल भविष्य घडविण्यासाठी आहे. यामुळे सर्व धुळेकरांनी आताच सावध होत आपल्या पुढच्या पिढ्यांचे भविष्य चुकीच्या विचारांच्या, चुकीच्या प्रवृत्तींच्या हातात देण्याऐवजी 'सब का साथ, सब का विकास' या विचाराने वाटचाल करणाऱ्या भारतीय जनता पक्षाच्या हाती सोपवावी. पक्षाच्या सर्व ५९ उमेदवारांना भरघोस मतांनी विजयी करावे, अशी साद भारतीय जनता पक्षाचे प्रदेशाध्यक्ष तथा आमदार रवींद्र चव्हाण यांनी धुळेकरांना घातली.**

शहरातील कान्हदेश कुलस्वामिनी आदिशक्ती श्री एकवीरादेवी मातेच्या मंदिरासमोरील प्रांगणात भाजपच्या सर्व ५९ उमेदवारांच्या प्रचारार्थ झालेल्या सभेत संबोधित करताना प्रदेशाध्यक्ष चव्हाण बोलत होते.

सभेला राज्याचे जलसंपदामंत्री गिरीश महाजन, पालकमंत्री जयकुमार रावल, भाजपचे संघटन महामंत्री विजय चौधरी, विभागीय संघटनमंत्री रवींद्र अनासपुरे, आमदार अनुपभय्या अग्रवाल, आमदार राम भदाणे, माजी मंत्री डॉ. सुभाष भामरे, जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा धरती देवरे, माजी आमदार राजवर्धन कदमबांडे, माजी आमदार कुणाल पाटील, भाजपचे महानगर जिल्हाध्यक्ष गजेंद्र अंपळकर, ग्रामीण जिल्हाध्यक्ष बापू खलाणे, माजी जिल्हाध्यक्ष बबनराव चौधरी यांच्यासह भाजपचे सर्व जिल्हा सरचिटणीस, सर्व मंडळाध्यक्ष यांच्यासह आजी-माजी पदाधिकारी व्यासपीठावर उपस्थित होते. भाजपचे निवडणूक रिंगणातील सर्व ५९ उमेदवारांसह त्यांचे समर्थक व महिला-पुरुषांनी मोठ्या संख्येने गर्दी केली होती.




सभेच्या सुरुवातीला कान्हदेश कुलस्वामिनी आदिशक्ती श्री एकवीरादेवी मातेच्या मंदिरात १०१ श्रीफळ वाढवून व मातेचे आशीर्वाद घेतल्यानंतर व सर्व उमेदवारांच्या विजयाचे साकडे घालण्यात आले.

सभेत बोलतांना प्रदेशाध्यक्ष चव्हाण म्हणाले की, या शहराला भगवी झालर लाभली आहे. ती टिकवून ठेवण्यासाठी महापालिकेच्या निवडणुकीत येत्या १५ जानेवारीला समस्त धुळेकर नागरिकांनी भारतीय जनता पार्टीच्या पाठीशी राहत पक्षाच्या सर्व उमेदवारांना भरघोस मतदान करत विजयी करायचे आहे. २०१४ पासून राज्यासह देशभरातील नागरिक भारतीय जनता पार्टीच्या पाठीशी ठामपणे उभे राहत आहेत. २०१४ पासून केंद्रात पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नेतृत्वातील केंद्र सरकार व राज्यातील मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील महायुती सरकार ज्या ताकदीने काम करत आहे. त्यानुसार धुळे शहराच्या सर्वांगीण विकासासाठी, विकसित, स्मार्ट आणि स्वच्छ धुळे बनविण्यासाठी आपण सर्व शहरवासीयांनी महापालिकेतही भाजपची सत्ता आणायची आहे. पक्षाचे आणि उमेदवारांचे चिन्ह घराघरात पोहोचविण्यासाठी व जनतेची साथ मिळविण्यासाठी उमेदवारांसह पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी सर्वतोपरी प्रयत्न करावेत, असे आवाहनही श्री. चव्हाण यांनी केले.

**विकासाचे व्हीजन तयार**

श्री. चव्हाण म्हणाले, की केंद्र व राज्य सरकारच्या सहकार्याने शहरातील विकासाचे जे प्रलंबित प्रश्न आहेत, ज्या समस्या आहेत त्या सोडविण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. भाजपने महापालिकेत २०१८ पासून सुरू केलेली विकासाची गंगा सातत्याने पुढे वाहती ठेवण्यासाठी आपण सर्वांनी भारतीय जनता पक्षाच्या पाठीशी राहावे. शहरात पावसाळ्यात पावसाचे पाणी साचून घरांमध्ये शिरणारे पाणी व त्यातून होणारे नुकसान थांबविण्यासाठी ५१३ कोटींची स्टॉर्म वॉटर योजना प्रत्यक्षात साकारण्यासाठी आम्ही सरकारकडे पाठपुरावा करू.

याशिवाय धुळे शहराचा पाणीप्रश्न सोडविण्यासाठी जीर्ण झालेली तापी योजनेची जलवाहिनी बदलण्यासाठी २२३ कोटी रुपयांचा प्रस्ताव लवकरात लवकर मंजूर करण्यासाठीही आम्ही कटिबद्ध राहू. जनसुविधेच्या प्रत्येक कामाला गती देण्यासाठी भाजपशिवाय पर्याय नाही. त्यासाठी तुमची आमची-भाजपा सर्वांची हा नारा घरोघरी पोहोचवा. पक्षाच्या संघटनात्मक ताकदीतून आपण महापालिकेच्या निवडणुकीत ५५ पेक्षा जास्त जागांवर विजय निश्चित साकारू, असा विश्वासही श्री. चव्हाण यांनी व्यक्त केला.

तत्पूर्वी जलसंपदामंत्री गिरीश महाजन, पालकमंत्री जयकुमार रावल, शहराचे आमदार अनुपभय्या अग्रवाल, माजी मंत्री डॉ.सुभाष भामरे यांनी भारतीय जनता पक्षाचे आगामी पाच वर्षांतील विकासाचे व्हीजन मांडत त्या मुद्द्यांवर भारतीय जनता पक्षाच्या निवडणूक रिंगणातील सर्व उमेदवारांना भरघोस मतांनी विजयी करण्याचे आवाहन केले.

### विक्रमी रक्तदानाप्रमाणे आता विक्रमी मतदान करा

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त पक्षस्तरावर सेवाभावीवृत्तीने राबविलेल्या रक्तदानाच्या उपक्रमात महाराष्ट्रातून धुळे शहरातील आबालवृद्ध नागरिकांनी विक्रमी रक्तदान करत राज्यात पहिला क्रमांक पटकावला होता. त्यासाठी समस्त धुळेकरांचे आभार मानतो. ज्या विश्वासाने धुळेकरांनी मुख्यमंत्री फडणवीस यांच्याप्रती प्रेम दाखवत आपले रक्त दिले, त्याच विश्वासातून आता महापालिकेच्या निवडणुकीतही विक्रमी मतांचे दान भाजपला देत पक्षाच्या सर्व उमेदवारांना भरघोस मतांनी विजयी करावे. तुम्ही भाजपप्रती दाखविलेल्या या विश्वासाला पक्षाचे वरिष्ठ व स्थानिक नेते कधीही तडा जाऊ देणार नाही, अशी ग्वाहीही श्री. चव्हाण यांनी दिली.

### जाहीरनाम्याचे प्रकाशन अन् अनेकांचा भाजप प्रवेश

**सभेच्या प्रारंभी विविध पक्षांच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी तसेच सामाजिक क्षेत्रात कार्यरत प्रतिष्ठित व्यक्तींनी आज मान्यवरांच्या उपस्थितीत भाजपमध्ये प्रवेश केला. यामध्ये शिवसेनेचे माजी जिल्हाप्रमुख तथा महापालिकेतील माजी विरोधी पक्षनेते राजेंद्र पाटील, वंदे मातरम् प्रतिष्ठानचे अध्यक्ष तथा उद्योजक सुमित बोरसे, सामाजिक कार्यकर्ते कपूरचंद बाविस्कर, साक्रीच्या प्रतिभा सूर्यवंशी, छगन सूर्यवंशी, कासारे गटाचे माजी जिल्हा परिषद सदस्य उत्तम देसले यांच्यासह त्यांचे समर्थक व कार्यकर्त्यांचा समावेश आहे. यानंतर महापालिका निवडणुकीसाठी पुढील पाच वर्षांच्या विकासाचे व्हीजन मांडणाऱ्या जाहीरनाम्याचे मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले.**

---

## थोडक्यात



### नायलॉन मांजाचा वापर, गुन्हा दाखल

**नंदुरबार ।** पतंग उडविण्यासाठी नायलॉन मांजाचा वापर करणाऱ्या एकाविरूध्द अक्कलकुवा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अक्कलकुवा तालुक्यातील खापर येथील साहिल फकीरा खाटीक (वय-१९) हा पतंग उडवितांना नायलॉन मांजाचा वापर करीत होता. प्रतिबंधीत नायलॉन मांजामुळे मानवी जिवीतासह पशुपक्षींना धोका आहे. परंतु नायलॉन मांजा वापर करतांना मिळून आल्याने साहील खाटीक याच्यावर कारवाई करण्यात आली आहे. याबाबत पोलीस नाईक चेतन कृष्णा साळवे यांनी अक्कलकुवा पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार साहील फकिरा पाटील याच्याविरूध्द पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### विद्यार्थिनींची शिरपूर कृउबासला क्षेत्रभेट

**शिरपूर ।** शहरातील एच. आर. पटेल कन्या प्राथमिक विद्यालयाच्या इयत्ता चौथीच्या विद्यार्थिनींनी क्षेत्रभेट या उपक्रमांतर्गत श्री साईबाबा मंदिर व कृषी उत्पन्न बाजार समिती या ठिकाणी भेट देऊन विविध कार्याची माहिती जाणून घेतली. मुख्याध्यापक मनोज पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबवण्यात आला. सर्व विद्यार्थिनींना शिरपूर कृषी उत्पन्न बाजार परिसर दाखविण्यात आला. यावेळी काही शेतकऱ्यांशी विद्यार्थिनींनी चर्चा केली. कोणत्या ऋतूत कोणतं पीक येतं, पिकाची पेरणी, मळणी कशा पद्धतीने केली जाते या पद्धतीचे सर्व ज्ञान शेतकरी बंधूंनी विद्यार्थिनींना दिले. त्याचप्रमाणे शेतकऱ्यांचा शेतीमाल कृषी उत्पन्न बाजारपेठेत आल्यानंतर कशा पद्धतीने त्याचा बाजार भाव केला जातो याचे प्रात्यक्षिक यावेळी दाखविण्यात आले.

---

## जिजामाता महाविद्यालयात डॉ.पंजाबराव देशमुख जयंतीनिमित्त व्याख्यान

प्रतिनिधी । नंदुरबार

**येथील जिजामाता शिक्षण संस्थेच्या कला, विज्ञान वाणिज्य महाविद्यालयात डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या शतकोत्तर रोप्य महोत्सवी जयंती वर्षानिमित्त व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. या व्याख्यानासाठी प्रा. प्रशांत बोर्डे व प्रा. डॉ. अमोल निपटे, खांडबारा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एस. पाटोळे उपस्थित होते.**

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मानसशास्त्र विषयाचे विभाग प्रमुख डॉ. राजेश मेश्राम होते. यावेळी प्रा. प्रशांत बोर्डे आपल्या व्याख्यानातून पंजाबराव देशमुख यांचे जीवन कार्य विद्यार्थ्यांसमोर मांडले. डॉ. राजेश मेश्राम यांनीही आपले विचार मांडले.

कार्यक्रमाला प्रा. जे.डी. महाजन, प्रा.के.जी. वसावे, डॉ. ए.बी. देशमुख, प्रा.वेस्ता वसावे व जिजामाता ज्युनियर महाविद्यालयाचे प्रा.एस.बी. सूर्यवंशी, प्रा. टी.जी. मोहने तसेच महाविद्यालयातील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.डॉ.विजय पंडित सूर्यवंशी यांनी केले तर आभार भौतिकशास्त्र विभागाचे प्रा. डॉ. डी.व्ही. सोनवणे यांनी मानले.

जिजामाता महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना भारतीय इतिहास, कला, संस्कृती यांची जाणीव व्हावी, प्रेरणा मिळावी यासाठी संस्थेच्या अध्यक्षा शोभा मोरे, सचिव डॉ.अभिजित मोरे, उपाध्यक्ष डॉ. विक्रांत मोरे, ॲड. राऊ मोरे यांच्या मार्गदर्शनाखालीच महाविद्यालयात विविध उपक्रम राबविले जातात, अशी माहिती आयोजकांतर्फे देण्यात आली.

## अक्कलकुवा येथे राष्ट्रीय ग्राहक दिन साजरा

**अक्कलकुवा ।** येथील तहसील कार्यालयात राष्ट्रीय ग्राहक दिन साजरा करण्यात आला. यावेळी तहसीलदार विनायक घुमरे, ग्राहक पंचायत जिल्हाध्यक्ष प्रा.संजय शर्मा, तालुकाध्यक्ष जीवनलाल भंसाली, सचिव अशोक सुर्यवंशी, सचिव ॲड. राजेन्द्र जैन, कोषाध्यक्ष प्रेमचंद जैन, प्रा.आर.ओ. मगरे, राजाराम राणे, शुभम भंसाली, रविन्द्र चौधरी, कृष्णा पंजराळे, पुरवठा अधिकारी नीलिमा कालमेघ, एचडीएफसी बँकेचे प्रतिनिधी, रेशन दुकानदार आदी उपस्थित होते.

## प्राजक्ता शिंदेची राष्ट्रीय महिला बॉक्सिंग स्पर्धेसाठी निवड

प्रतिनिधी । धुळे

**राज्य बॉक्सिंग संघाच्या निवड चाचणीत जिल्हा बॉक्सिंग संघटनेची बॉक्सर प्राजक्ता शिंदे हिने केलेल्या चमकदार कामगिरीच्या जोरावर राष्ट्रीय वरिष्ठ महिला बॉक्सिंग स्पर्धेसाठी निवड झाली आहे.**

पुणे येथील अरुण कुमार वैद्य स्टेडियम येथे पार पडलेल्या वरिष्ठ महिला महाराष्ट्र राज्य बॉक्सिंग संघाच्या निवड चाचणीत प्राजक्ता शिंदे हिने ५७ ते ६० किलो वजनी गटात उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत आपली निवड निश्चित केली. या निवडीमुळे प्राजक्ता शिंदे हिला जानेवारी २०२६ मध्ये ग्रेटर नोएडा (उत्तरप्रदेश) येथे होणाऱ्या नवव्या राष्ट्रीय वरिष्ठ महिला बॉक्सिंग स्पर्धेत महाराष्ट्र राज्याचे प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळाली आहे. ही निवड महाराष्ट्र बॉक्सिंग संघटनेचे महासचिव भरतकुमार व्हावळ व आंतरराष्ट्रीय प्रशिक्षक विजय गुजर यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली.

प्राजक्ता शिंदे सध्या शिरपूर येथील केव्हीपीएस बॉक्सिंग प्रशिक्षण केंद्र येथे प्रशिक्षक विजेंद्र जाधव व प्रा. भरत कोळी यांच्या मार्गदर्शनाखाली नियमित व कठोर सराव करत आहे.

राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाल्याबद्दल प्राजक्ता शिंदे हिच्यासह राज्य पदक विजेते खेळाडू नयन सोनवणे, रोहित सोनवणे, ओम राजपूत, नताशा पावरा, नैतिक माळी यांच्या उल्लेखनीय यशाबद्दल महाराष्ट्र बॉक्सिंग संघटनेचे उपाध्यक्ष तथा धुळे जिल्हा बॉक्सिंग संघटनेचे अध्यक्ष डॉ. तुषार रंधे, उपाध्यक्ष कैलास जैन, किसान विद्या प्रसारक संस्थेचे सचिव निशांत रंधे, खजिनदार आशाताई राधे, संचालक राहल रंधे, नगरसेवक रोहित रंधे, शशांक रंधे. धुळे जिल्हा बॉक्सिंग संघटनेचे कोषाध्यक्ष राजेंद्र बोरसे, एसपीडीएम महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. आबासाहेब देशमुख, डॉ.महेंद्र पाटील, डॉ. गोराणे, डॉ. व्ही.एम. पाटील, पाराघोगरे कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य विलास चव्हाण, केव्हीटीआर सीबीएसई स्कूलच्या प्राचार्या श्रीमती सुरेखा मिस्त्री, समन्वयक सागर वाघ, क्रीडा संचालक डॉ. लिंबाजी प्रताळे, किशोर पाटील, योगेश पाटील, सागर कोळी, क्रीडाशिक्षक नूर तेली, हेमंत शिरसाठ, राज्य पंच ऋषिकेश अहिरे, संघटनेचे सचिव मयूर बोरसे आदींनी अभिनंदन केले.

## भाजप उमेदवारांच्या प्रचारार्थ मुख्यमंत्री फडणवीसांची उद्या जाहीर सभा

### पांझराकाठी कालिकामाता मंदिर चौकात आयोजन

प्रतिनिधी । धुळे



**महापालिका निवडणुकीतील भारतीय जनता पक्षाचे ६३ पैकी चार उमेदवार बिनविरोध विजयी झाले. यानंतर आता निवडणूक रिंगणातील पक्षाच्या ५९ उमेदवारांच्या प्रचाराचे रणशिंग रविवारी (ता. ४) दुपारी प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी फुंकले. आता पुढच्या टप्प्यात येत्या मंगळवारी (ता. ६) दुपारी १२ वाजेला शहरातील पांझरा नदीकाठावरील कालिका माता मंदिर चौकात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची प्रचार तोफ धडाडणार आहे.**

महापालिका निवडणुकीसाठी भारतीय जनता पक्षाने ७४ पैकी ६३ जागांवर उमेदवार दिले आहेत. यापैकी माघारीच्या अंतिम मुदतीपर्यंत चार उमेदवारांची बिनविरोध निवड निश्चित झाली आहे. आता निवडणूक रिंगणात पक्षाचे ५९ उमेदवार आहेत. या उमेदवारांच्या सामूहिक प्रचाराचा श्रीगणेशा पक्षाचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या उपस्थितीत रविवारी दुपारी झाला. आता स्वतः मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भारतीय जनता पक्षाच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ जाहीर सभा आयोजित करून भाजपने प्रचाराचा धुराळा उडवून दिला आहे. शहरातील पांझरा नदीकाठच्या श्री कालिकामाता मंदिरासमोर मंगळवारी (ता. ६) दुपारी १२ वाजेला होणाऱ्या या सभेत मुख्यमंत्री फडणवीस भाजपच्या धुळे शहराच्या विकासात्मक अजेंड्याला साथ देण्यासाठी जनतेसमोर मतांचा जोगवा मागणार आहेत.

या सभेला राज्याचे जलसंपदामंत्री गिरीश महाजन, राज्याचे पणन व राजशिष्टाचार तथा जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार रावल, पक्षाचे संघटन महामंत्री विजय चौधरी, विभागीय संघटनमंत्री रवींद्र अनासपुरे, धुळे शहराचे आमदार अनुप अग्रवाल, धुळे ग्रामीणचे आमदार राम भदाणे, माजी केंद्रीय मंत्री डॉ.सुभाष भामरे, माजी आमदार राजवर्धन कदमबांडे, माजी आमदार कुणाल पाटील, भाजपचे महानगर जिल्हाध्यक्ष गजेंद्र अंपळकर, ग्रामीण जिल्हाध्यक्ष बापू खलाणे यांच्यासह पक्षाचे सर्व उमेदवार, पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित असतील. सभेला धुळेकर नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन पक्षाचे जिल्हा सरचिटणीस ओमप्रकाश खंडेलवाल, शशी मोगलाईकर, पवन जाजू, सुनील कपिल, महानगर जिल्हा उपाध्यक्ष श्याम पाटील यांनी केले.

---

## प्रभाग क्रमांक ३ च्या विकासासाठी निधी उपलब्ध करून द्या

### नगरसेविका जयश्री महाले यांचे रामदास आठवले यांना निवेदन

प्रतिनिधी । तळोदा

**नगरपरिषदेच्या प्रभाग क्रमांक ३ मधील सामाजिक, शैक्षणिक व पायाभूत विकास कामांसाठी सामाजिक न्याय विभागामार्फत निधी उपलब्ध करून देण्याची मागणी नगरसेविका जयश्री हंसराज महाले यांनी केंद्रीय सामाजिक न्याय व अधिकारिता राज्यमंत्री रामदास आठवले यांच्याकडे केली आहे.**

केंद्रीय मंत्री रामदास आठवले हे खाजगी कामानिमित्त शहादा येथे आले असताना नगरसेविका जयश्री महाले यांनी त्यांची भेट घेऊन निवेदन सादर केले. यावेळी आमदार राजेश पाडवी उपस्थित होते.



निवेदनात, तळोदा नगरपरिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीत प्रभाग क्रमांक ३ हा अनुसूचित जाती महिला प्रवर्गासाठी राखीव असून, भारतीय जनता पार्टी-रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (महायुती) यांच्या अधिकृत उमेदवार म्हणून जयश्री महाले या नगरसेविका म्हणून निवडून आल्या आहेत. या प्रभागात अनुसूचित जाती व सामाजिकदृष्ट्या दुर्बल घटकांची लोकसंख्या मोठ्या प्रमाणात असून, परिसरात मूलभूत सुविधांचा अभाव जाणवतो. सर्व विकास कामे सार्वजनिक जागेवर राबविण्यात येणार असून, सामाजिक न्याय, समता व सर्वसमावेशक विकासाच्या दृष्टीने उपयुक्त ठरणार असल्याचे नमूद करण्यात आले आहे. या कामांमुळे अनुसूचित जाती समाजासह संपूर्ण परिसराचा सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक स्तर उंचावण्यास मदत होईल, असा विश्वास नगरसेविका जयश्री महाले यांनी व्यक्त केला. यावेळी ना. रामदास आठवले यांनी निवेदन स्वीकारून सकारात्मक विचार करण्याचे आश्वासन दिले.

**प्रभागातील ओपन प्लेसमध्ये सुसज्ज उद्यान व संरक्षण भिंत उभारणे, ध्यान-धारणा व विपश्यना केंद्रांची निर्मिती, अंतर्गत रस्त्यांवर पथदिव्यांची उभारणी, सामाजिक न्याय भवन अथवा बहुउद्देशीय सभागृह, संविधान भवन तसेच दलित वस्तीतील समाज मंदिरात सुसज्ज ग्रंथालय उभारण्याबाबत निवेदनात मागणी करण्यात आली आहे.**

## पावणे तीन लाखांचे पंपाचे कंट्रोलर लंपास

प्रतिनिधी । नंदुरबार



दोन सोलर प्लेटचे नुकसान करीत मोटार पंपाचे कंट्रोलर चोरून नेल्याची घटना टेंभे येथे घडली. याप्रकरणी सारंगखेडा पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्यांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

शहादा तालुक्यातील टेंभा (त.सा.) येथील कुणाल शिवदास पाटील यांच्या शेतात ही घटना घडली. अज्ञात चोरट्यांनी पाटील यांच्या शेतातील दोन सोलर प्लेटचे नुकसान केले तसेच दोन लाख ७० हजार ३६० रूपये किंमतीचे मोटार पंपाचे कंट्रोलर चोरुन नेले.

याबाबत कुणाल पाटील यांनी सारंगखेडा पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार अनोळखीविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस नाईक जितेंद्र ईशी करीत आहेत.

## उत्तर महाराष्ट्राच्या शिरपेचात मानाचा तुरा

# एसएमबीटी हॉस्पिटलला एनएबीएच मानांकन

### सर्व सामान्यांसाठी परवडणाऱ्या आणि अत्याधुनिक आरोग्यसेवेचा नवा आदर्श

प्रतिनिधी । नाशिक

**आरोग्यसेवा जितकी उत्तम, तितकीच ती महागडी असते, हा समज आता एसएमबीटी हॉस्पिटलने खोटा ठरवला आहे. उत्तर महाराष्ट्रातील सर्वात मोठे चॅरिटेबल हॉस्पिटल असलेल्या 'एसएमबीटी'ला नुकतेच राष्ट्रीय स्तरावरील NABH (National Accreditation Board for Hospitals & Healthcare Providers) मानांकन प्राप्त झाले आहे. रुग्ण सुरक्षा, क्लिनिकल क्वालिटी, पेशंट अधिकारांना जपणारी आणि पारदर्शक उपचार पद्धतीचा हा राष्ट्रीय गौरव असून, जागतिक दर्जाची आरोग्यसेवा ही परवडणाऱ्या दरातही मिळू शकते, हे एसएमबीटी हॉस्पिटलने सिद्ध केले आहे.**




> **रुग्ण-केंद्रित व्यवस्था**
>
> ग्रामीण भागातील कुठल्याही रुग्णाच्या हॉस्पिटलमधील प्रवेशापासून ते डिस्चार्जपर्यंतची प्रत्येक प्रक्रिया ही पारदर्शक करण्यात आली आहे. रुग्ण सन्मान आणि सुरक्षितता यावर आधारित कार्यपद्धती अंगिकारली आहे. क्लिनिकल ऑडिट आणि सततच्या प्रशिक्षणाद्वारे उपचारांचा दर्जा खाजगी कॉर्पोरेट हॉस्पिटल्सच्या तुलनेत अधिक चांगल्या पद्धतीने उंचावण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत.
>
> **- डॉ. मीनल मोहगांवकर,**
> अधिष्ठाता, एसएमबीटी हॉस्पिटल

> **सुसज्ज कॅन्सर हॉस्पिटल लवकरच**
>
> एसएमबीटी हॉस्पिटलच्या रुग्णसेवेचा विस्तार होत असून येत्या वर्षभरात सर्व सोयीसुविधांनी परिपूर्ण असे स्वतंत्र कॅन्सर हॉस्पिटल सेवेत दाखल होणार आहे. यामध्ये सुपर स्पेशालिटी उपचारांसाठी स्वतंत्र विंग, पेट स्कॅन आणि रेडिएशन थेरपीची सुविधा उपलब्ध होईल. विशेष म्हणजे, या केंद्रासाठी टाटा मेमोरियल हॉस्पिटलसोबत तांत्रिक मार्गदर्शनाचा महत्त्वपूर्ण करार असल्यामुळे टाटा हॉस्पिटलच्या तज्ज्ञांची उपस्थिती आणि मार्गदर्शनासह विशेष प्रशिक्षित सपोर्टिंग स्टाफ याठिकाणी कार्यरत असेल.
>
> **- सचिन बोरसे,**
> सीओओ, एसएमबीटी हॉस्पिटल

महाराष्ट्रातील ग्रामीण आणि आदिवासी भागातील गरजू रुग्णांना पैशाअभावी उपचारांपासून वंचित राहू नये, या उदात्त हेतूने एसएमबीटी हॉस्पिटलची स्थापना झाली. अनेकदा 'एनएबीएच'मानांकन असलेल्या मोठ्या कॉर्पोरेट हॉस्पिटल्समध्ये उपचारांचा खर्च सर्वसामान्यांच्या आवाक्याबाहेर असतो. मात्र, एसएमबीटीने जागतिक दर्जाचे बदल करत असताना त्याचा आर्थिक भार रुग्णांवर पडू दिला नाही. सरकारी योजना, चॅरिटेबल सपोर्ट आणि संस्थात्मक सवलतींच्या माध्यमातून अत्यल्पदरात किंवा मोफत उपचार करण्यास सुरुवात केली.

महाराष्ट्रात मुंबई, पुणे किंवा नागपूरसारख्या शहरांतील मोजकीच नामांकित मेडिकल कॉलेज हॉस्पिटल्स या श्रेणीत येतात. मात्र, ग्रामीण भागाच्या उंबरठ्यावर असूनही एसएमबीटीने या महानगरांच्या तोडीची गुणवत्ता राखली आहे. येथे टाटा मेमोरियल हॉस्पिटल आणि इम्म्युनोॲक्ट सारख्या संस्थांशी करार असल्याने, ग्रामीण रुग्णांनाही प्रगत उपचार स्थानिक पातळीवर उपलब्ध झाले आहेत.

एसएमबीटी हॉस्पिटल परवडणारी आरोग्यसेवा हे ब्रीदवाक्य सोबत घेऊन शासकीय यंत्रणेवरील भार कमी करण्यासाठी सातत्याने प्रयत्न करत राहिले आहे. या कारणामुळेच महाराष्ट्रात योजना प्रभावीपणे राबविणाऱ्या रुग्णालयांत हॉस्पिटलचा तिसरा क्रमांक आहे. भक्कम पायाभूत सुविधा आणि अनुभवी तज्ज्ञांची उपलब्धता असलेले व समृद्धी महामार्गावर वसलेले हे १२०० बेड्सचे भव्य हॉस्पिटल आज अनेक रुग्णांची 'लाईफलाईन' ठरत आहे. सध्या या हॉस्पिटलमध्ये दररोज ८०० ते १००० रुग्णांवर बाह्यरुग्ण विभागात (ओपीडी) उपचार होत आहेत, तर ७०० ते ८०० रुग्ण आंतररुग्ण विभागात (आयपीडी) उपचारासाठी दाखल असतात. दररोज १०० ते १५० रुग्णांना डिस्चार्ज दिला जातो. तर तितकेच रुग्ण दर दिवशी याठिकाणी उपचारासाठी दाखलदेखील होतात.

अनेकदा मेडिकल कॉलेज म्हटले की, शिकाऊ डॉक्टर, उपचारांत दिरंगाई असे म्हटले जाते.

मात्र, एसएमबीटीने या सर्व गोष्टींवर मात करत एनएबीएच मानांकनावर मोहोर उमटवली आहे. इन्फेक्शन कंट्रोल, क्लिनिकल गव्हर्नन्स आणि सातत्यपूर्ण क्वालिटी ऑडिट यामुळे याठिकाणी रुग्णांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य दिले जाते. रुग्णसेवेचा दर्जा अधिक उंचावण्यासाठी येत्या वर्षभरात एसएमबीटी हॉस्पिटलमध्ये 'नर्सिंग एक्सलन्स' आणि 'डिजिटल एनएबीएच' हे मानांकन प्राप्त करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आल्याचे हॉस्पिटल प्रशासनाने सांगितले. या यशाबद्दल हॉस्पिटलची ऑपरेशन टीम, क्वालिटी टीम, नर्सिंग टीम व सिक्युरिटी सिस्टिम यांच्यासह हॉस्पिटलशी निगडीत प्रत्येक घटकाचे आभार याप्रसंगी मानले.

## म्हसवे शिवारात ट्रकच्या धडकेत पत्नी ठार, पती गंभीर जखमी

प्रतिनिधी । पारोळा

**येथील महामार्ग क्रमांक सहावरील म्हसवे शिवारातील मुरमुरा फॅक्टरीसमोर असलेल्या चौफुलीवर उंदीरखेडा येथील दाम्पत्यास ट्रकने धडक दिली. त्यात पत्नी रूपाली शुभम बोरसे ही ठार झाली तर पती गंभीर जखमी झाल्याची घटना घडली.**

पुरुषोत्तम पांडुरंग बोरसे (वय. ३५ वय, रा.उंदिरखेडे) यांनी पारोळा पोलीस ठाण्यात फिर्याद दिली की, ट्रक क्र. एचआर-५८-एफ-१३१३ वरील चालक वसीम इरफान रा. अमरपुर बेगमपुर, सहारनपुर राज्य-उत्तर प्रदेश याने भरधाव वेगात चालवून शुभम भाऊसाहेब बोरसे (वय. २५ वर्ष रा. उंदीरखेडे ता. पारोळा) हा त्याचे ताब्यातील होंडा शाईन मो.सा.क्र. एमएच-१९-सीके-६२५२ वर त्याची पत्नी रुपाली शुभम बोरसे (वय. २१ वर्ष रा. उंदीरखेडे ता. पारोळा) हीस मोटारसायकलच्या मागे बसवुन जळगावकडेस जात असतांना म्हसवे शिवारात जुना राष्ट्रीय महामार्ग क्र. ६ हा नवीन चार पदरी राष्ट्रीय महामार्ग क्र. ५३ ला जोडणी करणारा बायपासरोड क्रॉस करीत असतांना एरंडोलकडू धुळेकडे जाणारा ट्रक चालकाने होंडा शाईन हीस जोराची ठोस मारली. त्यात रुपाली शुभम बोरसे ही ठार तर शुभम बोरसे हे गंभीर जखमी झाले.

## थोडक्यात

### धनाजी नाना विद्यालय स्वाधीन यात्रा उपक्रम

**रावेर ।** खिरोदा येथील धनाजी नाना विद्यालय व ज्यु. कॉलेज येथे टेक्निकल विभागांतर्गत स्वाधीन यात्रा हा उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमानिमित्त गावातून ग्रामफेरी काढण्यात आली. नागरिकांमध्ये जनजागृती करण्याच्या उद्देशाने यात्रेचे आयोजन आय.बी.टी. विभागाने केले आहे.

### आग लावल्याने ८० क्विंटल मका खाक

**भुसावळ ।** तालुक्यातील बोहर्डीतील शेतकऱ्याच्या शेतातील मक्याच्या गंजीला अज्ञात व्यक्तीने आग लावून ८० क्विंटल मक्या पिकाचे नुकसान केल्याची घटना उघडकीस आली. याबाबत तालुक्यातील बोहर्डी बुदुक येथील शेतकरी माधव पांडुरंग झोपे यांच्या शेती शिवार गट नं ११२/११३ मधील काढलेल्या मका पिकाच्या जगाला आज्ञात व्यक्तीने आग लावल्याने शेतातील ८० क्विंटल मका जळून खाक झाल्याने शेतकऱ्यांचे नुकसान केले.

## पारोळा पं.स.गटविकास अधिकाऱ्यांकडून उंदीरखेडे ग्रामपंचायतची दप्तर तपासणी



प्रतिनिधी । पारोळा

**पंचायत समितीचे गटविकास अधिकारी भूषण कदम (उच्च्च श्रेणी) यांनी ग्रामपंचायत उंदीरखेडे येथे भेट दिली असता, त्यांनी मुख्यमंत्री समृद्ध ग्रामपंचायत योजने अंतर्गत ग्रामपंचायत कार्यालय, आपले सरकार सेवा केंद्र, ग्रामपंचायत अंतर्गत अभ्यासिका, आयुष्यमान भारत लाभार्थी यादी, ॲग्री स्टॉक नोंदणी झालेले शेतकरी, जलतारा शोषखड्डे प्रस्ताव, गोठा शेड, ग्रामपंचायत दप्तर, सोलर, सोलर लाईट, मुख्यमंत्री समृद्ध ग्रामपंचायत अंतर्गत ५० टक्के सूट आणि वसुली या सर्व बाबींविषयी महत्त्वाचे दप्तर आणि फाइल्स तपासणी करण्यात आली.**

श्री क्षेत्र नागेश्वर मंदिर येथे जाऊन त्या ठिकाणी केलेल्या वृक्षलागवड, परसबाग, दोराही गार्डन आणि विविध विकास कामांचा आढावा घेतला. तसेच श्री नागेश्वर भगवान यांचे दर्शन देखील केले आणि जिल्हा परिषद शाळेला देखील गटविकास अधिकारी यांनी भेट दिली. यावेळी गटविकास अधिकारी भूषण कदम यांचे स्वागत उंदीरखेडे ग्रामपंचायतचे सरपंच गणेश दत्तात्रय पाटील यांनी केले. संजीव सैंदाणे (विस्तार अधिकारी) यांचे स्वागत ग्राम पंचायत अधिकारी सुनील पाटील यांनी केले. यांच्यासोबत शुभम सपकाळ (स्थापत्य अभियंता) आपले सरकार सेवा केंद्र पंचायत समिती पारोळाचे तालुका व्यवस्थापक गणेश पाटील यांनी देखील ग्रामपंचायतीला भेट दिली.

## सातोद गावाला अनियमित पाणी पुरवठा; ग्रामस्थांच्या तक्रारी

प्रतिनिधी । यावल

तालुक्यातील सातोद ग्रामपंचायतीमार्फत होणारा पाणीपुरवठा हा फारच अल्प प्रमाणात आणि अनियमित होत असल्याची तक्रार ग्रामस्थांनी सरपंच ग्रामसेवक यांच्याकडे केली आहे.

सातोद येथील काही ग्रामस्थांनी १ जानेवारी रोजी ग्रामपंचायत सरपंच, ग्रामसेवक यांच्याकडे दिलेल्या तक्रारीत नमूद केले आहे की, ग्रामपंचायत मार्फत पाणीपुरवठा करणारा कर्मचारी व्हालमन हा काही दिवसापासून पाणीपुरवठा वेळेवर करीत नाही सध्या पाणी पुरवठ्याची वेळ सकाळी ४ वाजता ठेवण्यात आलेली आहे. ही वेळ सर्वसामान्य नागरिकांना गैरसोयीची असल्याने सदर वेळ सकाळी ६ वाजता करण्यात यावी. पाणी सोडण्याची जबाबदारी असलेली व्यक्ती व्हालमन पाणी हेतुपुरस्सर कमी प्रमाणात सोडतो, यामुळे काही भागात पाणी पोहोचत नसल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे.

## अशोक लाडवंजारी यांच्या प्रचाराचे नारळ उद्या फुटणार

प्रतिनिधी । जळगाव



सध्या महानगरपालिका निवडणुकीची रणधुमाळी सुरू आहे. अशा जळगाव महापालिकेच्या निवडणुकीचाही बिगुल वाजला असून या निवडणुकीच्या रणधुमाळीला सुरुवात झाली आहे. सर्वच राजकीय पक्षांसाठी प्रतिष्ठेची अशी ही निवडणूक आहे. त्यादृष्टीने शहरातील प्रभाग क्रमांक १४ अ मधील निवडणुकीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. अतिशय प्रतिष्ठेच्या असलेल्या या प्रभागातील निवडणुकीत अशोक सिताराम लाडवंजारी हे निवडणुकीच्या रणांगणात आहे. त्यांच्या प्रचाराचा मंगळवार दि. ६ जानेवारी रोजी शुभारंभ होत आहे.

> **जनसामान्यांच्या मनातला उमेदवार म्हणून अशोक लाडवंजारी यांची ओळख आहे. प्रभागातील समस्यांची जाण, दांडगा जनसंपर्क आणि मनमिळाऊ स्वभाव हा अशोक लाडवंजारी यांची ही जमेची बाजू आहे.**

अशोक लाडवंजारी, तडवी नाजमीन मकबुल, सना शेख रियाज, जमिलोद्दीन शेख शारीफुद्दीन शेख यांच्या प्रचार नारळाचा शुभारंभ मंगळवार दि. ६ जानेवारी रोजी सकाळी नऊ वाजता इच्छादेवी मंदिरात नारळ वाढवून आणि इच्छादेवी दर्शनाने होत आहे. याप्रसंगी माजी मंत्री तथा लोकनेते आमदार एकनाथराव खडसे, माजी आमदार संतोष चौधरी, राष्ट्रवादी काँग्रेस-शरद पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष प्रमोद पाटील, महानगराध्यक्ष एजाज मलिक, महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार अशोक लाडवंजारी यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती लाभणार आहे. यावेळी बोलताना अशोक लाडवंजारी यांनी सांगितले की, प्रभाग क्रमांक १४ अ च्या विकासासाठी आपण निवडणुकीच्या रिंगणात आहे. गेल्या काही वर्षात या प्रभागातील विकास रखडला आहे.

प्रतिस्पर्धी उमेदवार महापौर असताना देखील त्यांनी प्रभागाचा विकास केलेला नाही. प्रभागात स्वच्छता, साफसफाईचा बोजवारा उडाला आहे. रस्त्याच्या कामात मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाला आहे. त्यामुळे वार्डाचा विकास खुंटला आहे.प्रभागाचा विकास करण्यासाठी उमेवारी करीत असल्याचे अशोक लाडवंजारी यांनी सांगितले.

## हिंदू-मुस्लिम एकतेचे प्रतिक सुफी संत हजरत पीर बालेशबाबांचा उरूस

### आज संदल शरीफ, उद्या कव्वाली मुकाबला तर ७ रोजी कुस्ती स्पर्धांचे आयोजन





प्रतिनिधी । रावेर

**तालुक्यातील मोठा वाघोदा बुद्रुक येथील हिंदू मुस्लिम एकतेचे प्रतिक असलेल्या सुफी संत हजरत पीर बालेशा बाबा रहेमतुल्लाह अलै सरकार यांचा उरूस सोहळा सालाबादप्रमाणे यंदाही मोठा थाटाने जल्लोषात साजरा केला जाणार आहे.**

हजरत पीर बालेशा बाबा दर्गा पंचक्रोशीतील जातीय सलोखा एकात्मता अबाधित व कायम असलेले एकमेव तीर्थस्थान आहे ५ व ६,७, जानेवारी२०२६ या तीन दिवस या बाबां ची उरुस यात्रेचे आयोजन दरवर्षी हिंदू मुस्लिम एकता उर्स कमेटी तर्फे करण्यात येते या यात्रेला नववर्षाच्या ५ जानेवारी पासून सुरुवात होणार आहे यात दि ५ जानेवारी रोजी हजरत पीर बालेशा बाबा चादर संदल मोठ्या धुमधडाक्यात मिरवणूकीने चढविली जाईल तर ६ जानेवारीला कव्वाली कार्यक्रम होणार असून यात मुंबई येथील सुप्रसिध्द सुफी गायक कौसर साबरी ल भोपाल येथील प्रख्यात गझल गायीका निशाद नाज साबरी यांच्यात कव्वालीचा रंगतदार जंगी मुकाबल्याचे आयोजन हिंदू मुस्लिम एकता उरूस कमेटीतर्फे आयोजित करण्यात आला आहे.

## पाचोऱ्यात लोकनियुक्त नगराध्यक्षा सुनिता पाटील यांनी स्वीकारला पदभार

### • सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीचे औचित्य साधून घेतला पदभार

प्रतिनिधी । पाचोरा

**येथील नगरपरिषदेच्या लोकनियुक्त नगराध्यक्षा सुनिता किशोर पाटील यांनी शनिवारी नगरपरिषदेचा पदभार स्वीकारला.**



क्रांतिज्योती सावित्रीबाई फुलेंचा जयंतीदिनाचे औचित्य साधून महिला बचत गटाचे मार्गदर्शन शिबिर देखील आयोजित करण्यात आले होते. यावेळी मुख्याधिकारी मंगेश देवरे यांनी बचत गटाच्या महिलांना मार्गदर्शन करताना सांगितले की आमदार व पालकमंत्री यांच्या मार्गदर्शनाखाली पाचोरा येथे भव्य असा बहिणाबाई मार्ट साकारला जात असून बचत गटाच्या माध्यमातून याठिकाणी महिलांना व्यवसायाची संधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. सुनिताताई किशोर पाटील यांनी आपल्या भाषणात सांगितले की, आमदार व पालकमंत्री तसेच नगरविकास मंत्री आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पाचोरा शहराचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी १०० टक्के प्रयत्न करुन शहराला दररोज पाणीपुरवठा करण्यासाठी प्रयत्न केले जातील. आ. किशोरअप्पा पाटील यांनी आपल्या भाषणात सांगितले की निवडून आलेल्या सर्व नगरसेवकांनी आपल्या प्रभागातील समस्या सोडविण्यासाठी प्रयत्नशील असणे गरजेचे आहे. असं काम करा की लोकांनी पुन्हा तुम्हालाच उमेदवारी द्यावी, अशी मागणी केली पाहिजे. राज्याचे पाणीपुरवठा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी सांगितले की शहराच्या विकासासाठी व नवीन पाणीपुरवठा योजना मंजूर करून देण्यासाठी मी माझ्या परीने तत्काळ कामे पूर्ण करण्यासाठी प्रयत्नशील आहे.

## भुसावळ येथे सडक सुरक्षा-जीवन रक्षा सुरक्षितता अभियानास सुरुवात

प्रतिनिधी । भुसावळ



**केंद्र शासनाच्या रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालयाच्या सूचनेनुसार राष्ट्रीय सुरक्षितता अभियान राबविण्यात येत आहे. आगारात राज्य विज्ञान अध्यापक महामंडळाचे सचिव सुनील वानखेडे यांच्या हस्ते सुरुवात करण्यात आली.**

सडक सुरक्षा - जीवन रक्षा या सुरक्षितता अभियानाचे आयोजन करण्यात आले होते. अध्यक्षस्थानी सहाय्यक कार्यशाळा अधीक्षक सागर देवकर होते. यावेळी वाहक निरीक्षक सूरज पवार, लेखाकार एस. एफ. तडवी, सहाय्यक वाहक निरीक्षक एच.डी. चौधरी, कर्मचारी प्रतिनिधी धर्मराज देवकर, हेड मेकॅनिक जगन गोसावी, नितीन सोनवणे, किरण तायडे आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन धर्मराज देवकर यांनी केले.

> या कार्यक्रमात बोलताना सुनील वानखेडे म्हणाले की, प्रवासी रेल्वे प्रवासानंतर राज्य परिवहन महामंडळाच्या प्रवासाला प्राधान्य देतात. अशावेळी चालक व वाहकांवर प्रवाशांना सुरक्षितपणे त्यांच्या इच्छितस्थळी पोहोचवण्याची मोठी जबाबदारी असते. एका बसमध्ये सुमारे ४० प्रवाशांचे जीव एका चालकाच्या हाती असतात, त्यामुळे वाहन चालविताना सर्व वाहतूक नियमांचे काटेकोर पालन आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. यानंतर सुरक्षितता अभियानाच्या बॅचचे उद्घाटन करण्यात आले व त्या आगारातील चालक, वाहक तसेच तांत्रिक कामगारांना त्याची जबाबदारी निश्चित करण्यात आल्या.